महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग ,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२, मुंबई -४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२ २२७९३१६८ Email ID: sm३.sesd-mh@gov.in

क्रमांक-संकीर्ण-२०२३/प्र.क्र.३५/२३/एसएम-३ दि. १७ मे, २०२३

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

विषय :- सन २०१२ पूर्वी देण्यात आलेल्या ना हरकत प्रमाणपत्राच्या आधारे सूरू असलेल्या शाळांच्या मान्यतेबाबत.
संदर्भ:- नाहप्र-२०१३/(७५/१२)/माशि-१,दि. ०२/०८/२०१३.

उपरोक्त विषयावरील मॅनेजर, दर्शन अकॅडमी, एम्पायर इस्टेट, चिंचवड, पुणे यांचे दि. २०/०३/२०२३ रोजीच्या पत्राची प्रत सहपत्रासह यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२. दर्शन एज्युकेशन फाऊंडेशन, किरपाल आश्रम, संत किरपाल सिंग मार्ग, विजय नगर दिल्ली संचलित दर्शन अकॅडमी एम्पायर इस्टेट, सीटीएस नं. ४५१०/१, मुंबई-पुणे रोड, चिंचवड, पुणे या शाळेला इयत्ता १ ली ते १२ वी करीता शासन पत्र क्र.एनओसी २०११/(१३८/११)/एसई-१, दि. २७/०५/२०११ अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे आता सदर शाळेस परवानगी/प्रथम मान्यता देण्याची विनंती संस्थेने उपरोक्त पत्रान्वये केली आहे.

३. त्यानुषंगाने कळविण्यात येते की, शासनस्तरावरुन तात्पुरत्या व कायमस्वरूपी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या व सद्यस्थितीत शासन परवानगीशिवाय सुरु असलेल्या विवक्षित शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १८ व १२ अन्वये विहीत केलेले निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असतील तर अशा शाळांना शासन स्तरावरून परवानगी आहे, असे गृहीत धरून मान्यता देण्याची कार्यवाही संबंधित शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावरून करण्याबाबतच्या सूचना संदर्भाधीन दि.०२/०८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. तरी, त्याअनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी नियमानुसार आवश्यक कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला

(आ.रा. राजपूत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीकरीता अग्रेषित:-**
मॅनेजर, दर्शन अकॅडमी, एम्पायर इस्टेट, चिंचवड, पुणे.